# "नीट आणी महाराष्ट्राचे धोरण"

**मिलिन्द सोहोनी**

**आय. आय.टी. मुम्बई**

पुन्हा एकदा आपल्या बारावीच्या मुलांवर अनिश्चितता व संभ्रमाचे सावट पडले आहे. ह्याचे कारण आहे २८ एप्रिल २०१६ ला सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या स्वत:च्या २०१३ च्या निर्णयाचा फेरविचार करण्याचा घेतलेला निर्णय! मेडिकल कौंसिल ओफ ईंडिया (MCI) ला नीट, म्हणजे नॅशनल एलिजीबीटी कम एन्ट्रन्स टेस्ट, ही वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी द्यावी लागणारी प्रवेश परीक्षा घेण्याचा अधिकार होता. तो अधिकार २०१३ च्या निर्णयानुसार रद्द करण्यात आला होता. २०१६ च्या निर्णयामुळे पुन: "जैसे थे" आणी नीट ची टांगती तलवार ! कुतुहलाची गोष्ट ही की २०१६ चा निर्णय देणाऱ्या खंडपीठाचे अध्यक्ष आहेत न्या. अनिल दवे. २०१३ चा निर्णय  ज्या पीठाने दिला त्याचे न्या. दवे हे सदस्य होते व त्यांनी निर्णयाच्या विरुद्ध मत दिले होते. ह्या वर्षी नीट ही CBSE ह्या केन्द्र शासनाच्या बोर्डाच्या अभ्यासक्रमावर घेण्यात येणार आहे. ह्या परीक्षेतील क्रमवारीला (merit list) अनुसरून भारतातल्या सर्व वैद्यकीय संस्थांनी प्रवेश द्यायचा आहे. या सगळ्याला राज्यांकडून कडाडून विरोध होत आहे. त्यांचे म्हणने आहे की ह्या निर्णयामुळे ग्रामीण विद्यार्थी व मुलींवर अन्याय होत आहे. हा लेख प्रवेश प्रक्रिया व त्यामागचे सामाजिक व तात्विक मुद्द्यांचे एक विश्लेषण आहे .

प्रथम, नीट घेण्याचा महत्त्वपूर्ण अधिकार केन्द्र शासनाला आला घटनेच्या समवर्ती सूची (concurrent list) मधले कलम २५ च्या अंतर्गत. जरी शिक्षण हे क्षेत्र घटनेप्रमाणे राज्य शासनाच्या अखत्यारित असले तरी तंत्र व वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा सांभाळणे व राज्यांमधे समन्वय आण्याची जबाबदारी ही केंद्राकडे सोपविण्यात आली आहे. MCI ला परीक्षा घेण्याचा अधिकार किंवा AICTE व NAC या संस्थांची कार्यकक्षा, तसेच भारतातल्या वैद्यकीय शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना नीट ची परीक्षा देणे बंधनकारक असणे हे या अधिकारातून येते. अपेक्षित असे आहे की नीट / CBSE विध्यार्थांची योग्यता ठरवण्यासाठी एक गुणांक ठरवेल. विद्यार्थ्याला नीट मध्ये या गुणांकाच्या वर गूण मिळाले तर तो/ती वैद्यकीय संस्थांमधे प्रवेष घेण्याच्या योग्य आहे असे आपण समजावे. पण खरी परीस्थिती वेगळी आहे. नीट, ही संस्था, भारतातल्या सर्व विद्यार्थ्यांची त्यांना ह्या परीक्षेमध्ये पडलेल्या एकूण गुणांच्या आधारे देशपातळीवर एक क्रमवारी प्रसिद्ध करणार आहे. भारतातल्या सर्व शिक्षण संस्थांना या क्रमवारीप्रमाणे विध्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागेल. तसेच, प्रत्येक राज्याची जी काही सामाजिक उद्दिष्ट व आरक्षणं असतील त्याची

अंमलबजावणी सुद्धा ह्या क्रमाने करणे अपेक्षित आहे. प्रश्न असा पडतो की ६ तासाच्या एका परीक्षेमध्ये योग्यता ठरवणे जरी शक्य असले तरी या गूणांच्या आधारावर सर्व मुलांची क्रमवारी करणे हे संख्या शास्त्राच्या द्रुष्टीतून कितपत शास्त्र-शुद्ध व योग्य आहे? तसेच, कलम २५ च्या अंतर्गत केन्द्राला विद्यार्थ्यांची योग्यता ठरवण्याचा जो अधिकार आहे त्यातून त्यांची अशी क्रमवारी लावण्याचा अधिकार प्राप्त होतो का? दर्जा सांभाळताना देशातल्या सर्व विद्यार्थ्यांना एकाच क्रमवारीच्या साच्यात बसवणे कितपत योग्य किंवा गरजेचे आहे? विध्यार्थ्याची योग्यता ही स्वतंत्रपणे ठरवता येते, त्यात दोन विध्यार्थांची तुलना करण्याची आवश्यकता नाही. बुलढाणा जिल्ह्यामधली ग्रामीण मुलगी आणी पुण्याचा शहरी मुलगा ह्यांची तुलना करून क्रमवारी लावणं मुश्कील आहे आणि ते करताना केवळ गुण नव्हे तर इतर अनेक निकष लक्षात घ्यावे लागतील. जसेकी ग्रामीण भागसाठी डॉक्टर हवे असतील तर नक्किच बुलढाण्याच्या मुलीचा क्रम वर लागेल.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे नीट चा अभ्यासक्रम, जो आहे CBSE चा. CBSE या बोर्डाचे विद्यार्थी हे सामान्यत: शहरी व मध्यम वर्गीय असावे. CBSE ने त्यांच्या ११-१२ वी च्या अभ्यासक्रमाची व प्रयोगांची रचना या विद्यार्थीवर्गाच्या महत्वाकांक्षेला अनुसरून केली आहे. उदाहरण द्यायचे झाले तर, भौतिक शास्त्राच्या विषयांच्या मांडणीमध्ये विज्ञानाचा एक वैश्विक द्रुष्टीकोन अभिप्रेत आहे. विद्युत व चुंबक शास्त्र, अणू विज्ञान असे विषय त्यात सामावलेले आहेत. मात्र सामान्य नागरीकांच्या गरजांशी संबंधित आणि त्यांच्या जिव्हाळ्याच्या पाणी, शेती, चूल, यां विषयांचे विज्ञान त्यात नाही. ह्या उलट, तत्वत: तरी, प्रत्येक राज्य सरकार त्याच्या सामान्य नागरिकाच्या विकासाला योग्य असा अभ्यासक्रम तयार करण्यास स्वायत्त आहे. आपल्यासाठी तो सामान्य नागरिक आहे, ग्रामीण किंवा छोट्या शहरात राहणारा, आर्थिक व सामाजिक द्रुष्ट्या अल्प परिस्थितितला.

ही सगळी कोर्ट-कचेरी होत असताना प्रत्येक राज्याने त्यांना योग्य वाटेल अशी प्रवेश पद्धत अवलंबिली आहे. महाराष्ट्रामध्ये २०१६ साठी MHT-CET ची योजना आहे. तामिळनाडू मध्ये १२ वी च्या बोर्डाचे गुण ग्राह्य धरून महाविद्यालयांमध्ये प्रवेष देण्यात येत आहे. हा खरोखरच फार अभिनव व सामाजिक द्रुष्ट्या पुरोगामी निर्णय आहे व ह्याचे पर्यवसान काय होते याचा अभ्यास महाराष्ट्राने करायला हवा. तामिळनाडूची आर्थिक व सामाजिक विकासाची घोडदौड अव्याहत चालू आहे .

नीट लागू झाली तर त्याचे काय परिणाम असतील याचा थोडा विचार करुया. नीट सारखेच जेईई हे देखिल एक केंद्रशाषित CBSE च्या अभ्यासक्रमावर परीक्षा आहे. ती तंत्रशिक्षण संस्थांच्या

प्रवेषासाठी वापरली जाते. ही क्रमवारीवर आधारित पद्धत अनेक वर्षापासुन IIT व NIT या केंद्रशाषित संस्था व त्याच बरोबर अनेक राज्यांतील इतर शिक्षण संस्थांच्या प्रवेशासाठी वापरली जात आहे. नवीन AIIMSs ह्या केंद्रशाषित संस्थांच्या आगमनामुळे, काही वर्षांनी वैद्यकीय क्षेत्र हे देखिल तंत्रशिक्षण क्षेत्रासारखे दिसेल. तंत्रशिक्षण क्षेत्रात काय घडत आहे हे बघितले तर काही गोष्टी थक्क करतात. २०१२ च्या जेईई मध्ये अर्ज केलेल्यांपैकी फक्त ३३% मुली होत्या व पास होणाऱ्यांमध्ये हे प्रमाण १८% वर पोचले. २०१३ मध्ये जेईई (IIT), मुलींचे पास होण्याचे प्रमाण फक्त १२% होते. या उलट CBSE बोर्डाच्या परीक्षेत (म्हणजे जेईई च्याच अभ्यासक्रमावर) सर्वाधिक गुण मिळवलेल्या १% विध्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण ५०% हून अधिक होते. जेईई मधे अर्जदारांपेकी फक्त २२% ग्रामीण होते व पास होणाऱ्यांमध्ये हे प्रमाण १८% वर आले . ३०% मुलांनी coaching class घेतल्याचे कबूल केले. श्रीमंत विद्यार्थ्यांमध्ये पास होण्याचे प्रमाण हे गरीब मुलांच्या ६ पट होते. त्याच प्रमाणे CBSE मधून आलेल्यांची संख्या ५०% च्या वर होती. हाच प्रकार २०१४-१५ मध्ये ही चालू आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांची सामाजिक परिस्थिती, जेईई चे स्पर्धात्मक स्वरूप आणी CBSE बोर्डाचा नक्किच काहीतरी संबंध आहे आणी तो विषमता वाढवणारा दिसतो आहे.

CBSE बोर्डाचा अभ्यास केला तर आपल्याला दिसते की २०१३ मध्ये या बोर्डातून पास होणाऱ्यांची संख्या ८.०८ लाख होती. २०१५ मध्ये ही संख्या गेली १०.०७ वर, म्हणजे २ वर्षात जवळ-पास २५% वाढ. चेन्नैइ सर्कल मध्ये ही वाढ होती ११,००० पासुन २६,००० पर्यंत. ह्यातली बरीचशी वाढ खाजगी शाळांमध्ये होती. ह्याचा अर्थ की स्पर्धात्मक परीक्षांमुळे किंवा इतर कारणांमुळे, मुले ही CBSE कडे वळत आहेत. हे राज्यांच्या शालेय शिक्षण व्यवस्थेला अपायकारक असू शकते. हे असे होत राहिले तर राज्य बोर्ड हे फक्त ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांचे बोर्ड असे समीकरण होणे स्वाभाविक आहे. ह्याचा अर्थ की राज्य सरकारांनी नीट विषयी उपस्थित केलेल्या सामाजिक व घटनात्मक मुद्द्यांमध्ये नक्किच काही तथ्य आहे.

याहून महत्त्वाचा एक दुष्परिणाम म्हणजे आज तंत्रशिक्षण क्षेत्रात जे काही घडत आहे तो. जेईई मुळे, हजारो कोटी रुपये खर्च करून मुले coaching घेत आहेत व पास होणाऱ्यांमध्ये त्यांचे प्रमाण जास्त आहे. ह्याचा एक परिणाम हा की आय.आय.टी.चा सामान्य विद्यार्थी हा भारतीय अर्थव्यवस्थेत राहून तंत्रज्ञान विकसित करण्यापेक्षा बहू-राष्ट्रीय कंपन्यांमध्ये सेवाक्षेत्रात पण लठ्ठ पगाराची नोकरी घेत आहे.  म्हणजेच जेईई चा फायदा सेवाक्षेत्रातल्या बहू-राष्ट्रीय कंपन्या व त्यांमध्ये नोकरी मिळवण्यास ईच्छुक विद्यार्थी यांना होत आहे. ह्याच बरोबर मुली व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या

अभावामुळे स्थानिक प्रश्न व समस्या यांच्यावर अभ्यास व संशोधन होत नाही. आय.आय.टी.ची पद्धत हीच खरी तंत्रज्ञानाची पद्धत ही गैरसमजूत झाल्यामुळे राज्य पातळीच्या संस्थांमध्ये सुद्धा शिक्षण व संशोधन यांचा प्रादेशिक समस्या व उद्योग याच्याशी संबंध तुटला आहे. हे सगळे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात सहज घडू शकते. समाजाने उत्तमोत्तम ठरविलेल्या काही निवडक संस्था, राष्ट्रपातळीवरील स्पर्धात्मक क्रमवारी, वैद्यकीय क्षेत्रातल्या काही मोठ्या कंपन्या आणि नामांकित व व्यावसायिक रुग्णालये यांचे संचलन होणे सहज शक्य आहे. शहरी, मध्यम वर्गीय आणि कोचिंगचा खर्च परवडू शकणारे विध्यार्थीच उच्च शिक्षण संस्थामधून तयार होतील आणि सर्वसामान्य माणसाच्या गरजा भागावान्यासाठी आपले कौशल्य वापरण्याएवजी मोठ्या कंपन्या किंवा व्यवसायिक रुग्नालायांचीच चाकरी करतील. म्हणजेच, जे दुष्टचक्र तंत्रशिक्षण क्षेत्रात आहे ते वैद्यकीय क्षेत्रात पसरेल व डॉक्टरकी या मुळात सेवाभावी पेश्याला एक वेगळेच उत्तमोत्तमतेचे अनिष्ट वळण प्राप्त होईल. असे घडले तर हे सार्वजनिक स्वास्थ्याच्या द्रुष्टीने फारच घातक ठरू शकते. ह्या सगळ्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे.

ह्याच बरोबर न्या. दवे ह्यांनी २०१३ मधे लिहिलेली टिप्पणी ही देखिल मत्त्वाची आहे . योग्यता नसलेल्या विद्यार्थ्यांना  प्रवेष दिल्यास, तेही भरमसाट फी घेऊन, वैद्यकीय पेश्याची हानी तर होतेच, पण त्याच बरोबर जनतेची पिळवणूक व फसवणूक होण्याची शक्यता वाढते.  या परिस्थितीत एक सुवर्ण मध्य साधू शकणारा उपाय हा की नीट ने योग्यता ठरवावी व राज्यांनी त्यांच्या सामाजिक कर्तव्य व उद्दिष्टिना अनुसरून क्रमवारी ठरवावी. म्हणजेच, नीट चे गुण हे फक्त योग्यता ठरवण्यापुरते वापरावे, व शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश हा राज्यांनी त्यांच्या CET किंवा तामिळनाडू करते तसे बोर्डाच्या गुणांप्रमाणे करावा. केन्द्राची दर्जा सांभाळण्याची घटनात्मक जबाबदारी व राज्यांची शिक्षण या क्षेत्रातली स्वायत्त्ता या दोनी गोष्टी साध्य होत आहे. खरे तर आय.आय.टी. व इतर केंद्रशाषित संस्थांमध्ये सुद्धा प्रवेशासाठी हा उपाय लागू करता येईल. या संस्था स्पर्धात्मक दुष्टचक्रात सापडल्या आहेत व त्यातून बाहेर पडण्याचा हा एक मार्ग आहे . एकुणच, उच्च शिक्षण हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे, व प्रगती साठी महत्त्वाचे साधन आहे. ह्यामधे सुधार किंवा परिवर्तन आणायचे असेल तर योग्यता, गुणवत्ता व सामाजिक उद्दिष्टे यांच्या मध्ये समतोल राखून मार्ग शोधणे हे अतिशय गरजेचे आहे.

आभार: कल्याण टांकसाळे.